ई–फाईल

| MHAU020011362025 | दाखल तारीख – | ०४–०३–२०२५ |
|---|---|---|
| | नोंदणी तारीख – | ११–०३–२०२५ |
| | निकाल तारीख – | १४–१०–२०२५ |
| | कालावधी – | ००व. ०७म. १०दि. |

**औरंगाबाद येथील १४ वे सह दिवाणी न्यायाधीश यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी – अ. र. शेंडगे )**

{न्यायनिर्णय घोषीत दिनांक – १४/१०/२०२५}

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.५३१/२०२५** **नि.क्र. २४**

१. शेख मुनीर जिलानी
वय : सज्ञान, धंदा – शेती,
रा. वेरुळ ता. खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर.

२. शेख याकुब प्यारुभाई
वय – सज्ञान, धंदा शेती,
रा. वरीलप्रमाणे

३. शेख यासीन प्यारुभाई
वय – सज्ञान, धंदा – शेती,

४. शेख बशीर प्यारुभाई
वय सज्ञान, धंदा – शेती,
रा. वरीलप्रमाणे

५. शेख इस्माईल प्यारुभाई
वय सज्ञान, धंदा– शेती,
रा. वरीलप्रमाणे

६. शेख शिकुर प्यारुभाई
वय – सज्ञान, धंदा शेती,
रा. वरीलप्रमाणे

७. शेख शब्बीर प्यारुभाई

वय – सज्ञान, धंदा – शेती,
रा. वरीलप्रमाणे

८. शेख नुरजहा बेगम
वय – सज्ञान, धंदा – शेती,
रा. वरीलप्रमाणे

९. शेख नझमुन्निस्सा बेगम
वय – सज्ञान, धंदा – शेती,
रा. वरीलप्रमाणे

१०. शेख नुरुद्दीन प्यारुभाई
वय– सज्ञान, धंदा – शेती,
रा. वरीलप्रमाणे

११. शेख छोटे मिया हाजीमिया
वय – सज्ञान, धंदा – शेती,
रा. वरीलप्रमाणे

१२. शेख रफिक हजीमिया
वय – सज्ञान, धंदा – शेती,
रा. वरीलप्रमाणे

१३. शेख रौफ हजीमिया
वय – सज्ञान, धंदा शेती,
रा. वरीलप्रमाणे

१४. शेख हफीझ सलीमुद्दीन
वय – सज्ञान, धंदा – शेती,
रा. वरीलप्रमाणे

१५. शेख हमीद सलीमुद्दीन
वय – सज्ञान, धंदा – शेती,
रा. वरीलप्रमाणे.

१६. शेख मोईन सलीमुद्दिन
वय – सज्ञान, धंदा – शेती,

रा. वरीलप्रमाणे

१७. शेख रहेमान सलीमुद्दीन
वय – सज्ञान, धंदा– शेती,
रा. वरीलप्रमाणे

१८. शेख अब्दुल रशीद दादामिया
वय – सज्ञान, धंदा – शेती,
रा. वरीलप्रमाणे

**या सर्वांतर्फे आममुखत्यार**

शेख करीम शेख गणी,
वय – ४४ वर्षे, धंदा व्यापार,
रा. वेरुळ, ता. खुलताबाद, जि.छ. संभाजीनगर ..... **अर्जदार**

विरुध्द

१. महाराष्ट्र शासन तर्फे
जिल्हाधिकारी औरंगाबाद

२. अब्दुल रहेमान अब्दुल शकूर
वय – ६० वर्षे, धंदा – शेती,
रा. घर नं. १७–१–१८२/डी/७२, मदनापेठ,
संतोष नगर, हैद्राबाद. ...... **गैरअर्जदार**

---

**प्रकरण** :– भारतीय वारसा हक्क कायदा १९२५ चे कलम ३८३ प्रमाणे गैरअर्जदार क्र. २ यांच्या हक्कात मा. न्यायालयाने किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १०५२/२०१२ मध्ये दिनांक २५.०९.२०२४ रोजी आदेश पारित करुन दिलेले वारस प्रमाणपत्र रद्द करणे बाबत.

---

अर्जात हजर विधिज्ञ :– अर्जदार तर्फे – श्री. एस.व्ही. भागडे पाटील
गैरअर्जदार क्र.२ तर्फे – एकतर्फा

---

## न्यायनिर्णय

**(पारीत दिनांक : १४/१०/२०२५)**

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार क्रमांक १ ते १८ यांनी भारतीय वारसा हक्क कायदा १९२५ चे कलम ३८३ प्रमाणे गैरअर्जदार क्र.२ याचे हक्कात दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक १०५२/२०१२ मधील दिनांक २५/०९/२०२४ रोजी केलेल्या आदेशानुसार देण्यात आलेले वारस प्रमाणपत्र रद्द करून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. गैरअर्जदार क्र.२ यास नोटीसची बजावणी ही जाहीर प्रकटन द्वारे करण्यात आलेली आहे. गैरअर्जदार क्र.२ हा हजर न झाल्याने त्याच्याविरुद्ध प्रकरण हे एकतर्फा चालवण्यात आलेले आहे.

२. अर्जदार यांचे वतीने कुलमुखत्याराधारक शेख करीम शेख गनी यांनी पुरावा दिलेला आहे.

३. अर्ज, अर्जदार यांचा पुरावा व दाखल कागदपत्रे तसेच अर्जदार यांचे विधीज्ञ यांचा युक्तिवाद विचारात घेता खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित झालेला आहे. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसासह नोंदवत आहे :–

| अ.क्र. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | गैरअर्जदार क्र.२ याने दिवाणी किरकोळ अर्ज नंबर १०५२/२०१२ मधील प्रमाणपत्र हे वस्तुस्थिती लपवून व खोटे सुचन करुन मिळवलेले आहे काय? | होकारार्थी |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

४. अर्जदार यांचे कथनाप्रमाणे, ते वेरूळ येथे राहतात व शेती व्यवसाय करतात. त्यांनी त्यांच्या नात्यातील शेख करीम शेख यास गट नंबर २३ मधील जमिनीसंबंधी दिवाणी न्यायालय व महसूल न्यायालय प्रकरण दाखल करण्यासाठी

कुलमुखत्यार म्हणून नियुक्त केलेले आहे. मौजे वेरूळ तालुका खुलताबाद जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथील जमीन गट नंबर २३, २ हेक्टर ७३ पोट खराब ३९ आर व गट नंबर २१८ मधील ५० आर जमिनीचे मूळ मालक शेकू लालमियाँ हे होते. त्यांची निधनानंतर अर्जदार यांनी दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर औरंगाबाद या ठिकाणी नियमित दावा क्रमांक ६६९/२००८ हा वाटणी होऊन मिळण्यासाठी दाखल केला, त्या दाव्यामध्ये दिनांक ३१/०१/२००९ रोजी तडजोड होऊन तसेच तहसील कार्यालय खुलताबाद यांचे दिनांक ०६/०८/२००९ चे पत्र यानुसार महसूल दप्तरी फेरफार क्र.२९४७ मंजूर केला. त्यानंतर दिनांक ०७/०५/२०१२ रोजी दिवाणी न्यायालयाचा हुकूमनामा याप्रमाणे फेरफार क्र. ३५०६ हा मंजूर झालेला आहे.

५. गैरअर्जदार क्र.२ यांनी दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक १०५२/२०१२ यामध्ये सत्य परिस्थिती लपून न्यायालयाची दिशाभूल करून वारस प्रमाणपत्र प्राप्त करून घेतले. ते वारस प्रमाणपत्र रद्द करणे योग्य आहे. वारस प्रमाणपत्रसाठी अर्ज दाखल करण्यापूर्वी गैरअर्जदार क्र.२ याने दिवाणी न्यायालय तथा सिटी सिविल कोर्ट हैदराबाद या ठिकाणी अर्ज क्रमांक १७१३/२०११ दाखल केलेला होता. जो न्यायालयाने दिनांक २२/०९/२०१८ रोजी खारीज केलेला आहे. गैरअर्जदार क्र.२ याने आपल्या अर्जात नमूद न करता ती बाब न्यायालयापासून लपवून ठेवली. अर्ज करताना गैरअर्जदार क्र.२ यांनी तो कधी मुंबईला तर कधी वेरूळला तर कधी हैदराबादला राहतो असे नमूद केलेले आहे. गैरअर्जदार क्र.२ यांनी त्याची आई हयात अथवा मयत आहे याबद्दल कोणताही उल्लेख केलेला नाही.

६. गैरअर्जदार क्र.२ यांनी दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर खुलताबाद या ठिकाणी नियमित दिवानी दावा क्रमांक ५६/२०१२ अब्दुल रहमान विरुद्ध शेख अल्लाउद्दीन व इतर दाखल केलेला होता. त्याचा देखील कोणताही उल्लेख वारस प्रमाणपत्र मिळण्याचे अर्जामध्ये केलेला नाही. त्याबाबतची सत्य परिस्थिती लपवून ठेवलेली आहे. दिवाणी न्यायालय खुलताबाद यांनी ३०/०७/२०१२ रोजी निशाणी क्रमांक ५ वर आदेश

पारित करून गैरअर्जदार क्र.२ यांनी मनाई हुकूमसाठी केलेला अर्ज नामंजूर केलेला आहे. तो दावा हा दिनांक १९/०३/२०१९ रोजी अंतिम रित्या निकाली काढून खारीज केलेला आहे.

७. गैरअर्जदार क्र.२ याच्या अर्जात नमूद मिळकतीचे मूळ मालक शकु लालमियाँ यांच्याशी कोणताही संबंध नसून शिकूलालमियॉ हे विना आपत्य मयत झालेले आहेत. त्यांना कोणीही वारस नसताना गैरअर्जदार क्र.२ यांनी त्यांची मिळकत गिळंकृत करण्याच्या उद्देशाने सत्य परिस्थिती लपवून न्यायालयाची दिशाभूल करून वारस प्रमाणपत्र मिळण्याकरता प्रकरण दाखल केले व तसे ते प्राप्त करून घेतलेले आहे. जमिनीचे मूळ मालक यांचेशी गैरअर्जदार क्र.२ याचा कोणताही संबंध नसताना व त्याचे नाव शकूर लालमियाँ यांच्यासोबत जुळत नसताना न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज करून ते प्राप्त केले, जे रद्द होण्यास पात्र आहे. अर्जदार यांना उपजिल्हाधिकारी छत्रपती संभाजी नगर यांच्याकडे प्रकरण क्र. २०२१/अपील /एम.एल.आर.सी./सी.आर–०१३ मध्ये दिनांक १८/०४/२०२४ रोजी पारित केलेले तर्फे आदेशाची प्रत दिनांक ३०/०१/२०२५ रोजी प्राप्त झाल्यानंतर मिळाली. अर्जदारांनी त्याबाबत अप्पर विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांच्या न्यायालयात रिव्हिजन दाखल केलेले आहे. अर्जदार यांना आव्हानीत आदेशाची माहीती मिळाल्यापासून तो मुदतीमध्ये आहे.

८. अर्जदार यांचे विधिज्ञ यांनी युक्तीवाद दरम्यान सांगितले की, सदरील अर्ज हा मंजूर करण्यात येवून गैरअर्जदार क्र. २ याचे हक्कात दिलेले वारस प्रमाणपत्र हे रद्द करण्यात यावे. त्यांनी दाखल कागदपत्र पाहता व अर्जदार यांचा पुरावा पाहता गैरअर्जदार क्र.२ याने वास्तविक स्थीती ही लपवून तो अर्ज मंजूर केला होता. मयत लालामियॉ यांचेशी कोणताही संबंध नसतांना तसे वारस प्रमाणपत्र मिळवले आहे, जे रद्द करणे गरजेचे आहे. त्यांनी दिवाणी न्यायालयातील नियमीत दिवाणी दावा क्र. ६६९/२००८ मधील झालेली तडजोड पाहता सदरील मिळकतीशी गैरअर्जदार क्र. २ याचा कोणताही संबंध नाही हे स्पष्ट होते आहे असे सांगितले. अर्जदार यांची नावे ही त्या तडजोडपत्राअधारे

जमीनीचे ७/१२ मिळकतीस लागलेली आहेत. गैरअर्जदार क्र.२ याने नियमीत दिवाणी दावा क्र.५६/२०१२ हा दाखल केला होता, ज्यामध्ये मनाई आदेश मागितला गेला होता. न्यायालयाने तो अर्ज नामंजूर केला होता, त्यानंतर दावा देखील खारीज करण्यात आलेला आहे. सदरील प्रकाण हे अर्जदार यांनी दाखल केल्यानंतर गैरअर्जदार क्र.२ यास नोटीस काढण्यात आली. गैरअर्जदार क्र. २ यास अनेक वेळा नोटीस पाठवली असता तो जाणीव पुर्वक घेण्यास टाळाटाळ करीत असल्याचे दिसून आल्याने त्याचे हैद्राबाद या पत्यावर वेरुळ, खुलताबाद या ठिकाणीच्या पत्यावर बजावणी होण्यासाठी वर्तमानप्रत्रामध्ये जाहीर प्रकटन प्रस्धिद करण्यात आले. गैअर्जदार क्र.२ याने एमएआरजेआय क्र.१०५२/२०१२ मध्ये देखील त्याचा पत्ता हा वेरुळ ता. खुलताबाद जि. औरंगाबाद असाच नमुद केलेला आहे.

९. सदरमध्ये गैरअर्जदार क्र.२ हा जाहीर प्रगटन होवून देखील हजर झाला नाही, त्यामुळे प्रकरण हे एकतर्फा आदेश पारीत करुन चालविण्यात आलेले आहे. सदरील प्रकरणात निर्णयासाठी एमएआरजेआय क्र. १०५२/२०१२ ही संचिका गरजेची असल्याने अभिलेखकक्षातून ती मागविण्यात आली. तिचे देखील बारकाईने आवलोकन केले. गैरअर्जदार क्र.२ याने सदरील वारस प्रमाणपत्र हे वस्तुस्थिती लपून घेतले आहे काय हे पाहणे गरजेचे आहे. सदरील प्रकरणात वारर प्रमाणपत्र हे दिनांक ३०/०९/२०१४ रोजी दिले गेले आहे. गैरअर्जदार क्र.२ याने ते वारस प्रमाणपत्र हे गट क्र. २३ मधील ०२ हे ७३ आर पोटखराब ३९ आर व गट क्र.२१८ मधील ५० आर क्षेत्र मौजे वेरुळ ता. खुलताबाद जि. औरंगाबाद येथील मिळकतींना नाव लावण्यास काढलेले होते. गैरअर्जदार क्र. २ याने त्याचा वापर हा केला नव्हता. सन २०१४ मध्ये वारस प्रमाणपत्र घेतल्यानंतर इतके दिवस त्याचा वापर न करणे हे देखील बाब शंका निर्माण करणारी आहे. तसेच, त्या अर्जामध्ये त्याच्या आईच्या नावाचा कोणताही उल्लेख केलेला नाही, ती हयात आहे किंवा मयत झालेली आहे याबाबतचे देखील कोणते स्पष्टीकरण नाही.

१०. अर्जदार यांनी गैरअर्जदार क्र. २ याचे नांव अब्दुल रहेमान अब्दुल शकूर

असल्याने त्याचा गैरफायदा घेवून वारस प्रमाणपत्र मिळवले आहे असे नमुद केले आहे. गैरअर्जदार क्र.२ याने १९वे दिवाणी ज्युनिअर न्यायाधीश सीटी कोर्ट यांचेकडे ओ एस क्र. १७१३/२०११ दाखल केला होता, त्याचे निकालपत्र दाखल आहे. ज्यामध्ये गैरअर्जदार क्र. २ हा अब्दुल शकूर व अझीमुनीसा बेगम यांचा मुलगा असल्याचे जाहीर केले आहे. ज्यामध्ये वडीलांचे नाव अब्दुल शकूर अब्दुल माजीद असे नमूद केलेले आहे. एमऐआरजेआय नं.१०५२/२०१२ यामध्ये गैरअर्जदार क्र. २ याने त्याचे जन्माचा दाखला व वडीलाचे मुत्युप्रमाणपत्र दाखल केले आहे. सदरील संचिका यामधील ड भाग नाश केलेला आहे. क भाग यामध्ये निशाणी क्र.१२ व १३ वर ते प्रमाणपत्रे आहेत. ज्यामध्ये गैरअर्जदार क्र. २ याचे वडीलांचे नाव हे अब्दुल शकूर अब्दुल माजीद असे नमूद आहे, ज्यामध्ये कोठेही लालामियॉ असे नमूद नाही. तो अर्ज दाखल करताना मात्र वडीलांचे नाव अब्दुल शकूर लालामियॉ उर्फ अब्दुल माजीद असे केले आहे. हैद्राबाद येथील दाखल केलेल्या प्रकरणात कोठेही वडीलांचे नाव शकूर लालामियॉ उर्फ अब्दुल माजीद होते असे नमूद नाही. लालामियॉ याचा उल्लेख केवळ एमएआरजेआय नं.१०५२/२०१२ मध्ये केल्याचे दिसून येते. तसेच त्यामध्ये गैरअर्जदार क्र.२ याचे आई बाबत कोणताही उल्लेख केलेला नाही.

११. शकूर यांचे वडीलांचे नाव लालामियॉ उर्फ अब्दुल माजीद होते असे दाखवणारा कोणताही पुरावा त्यामध्ये दिलेला नाही असे दिसून येते. त्यामुळे एकंदरीत दाखल केलेला पुरावा व कागदपत्रावरुन गैरअर्जदार क्र.२ याने दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१०५२/२०१२ मधील प्रमाणपत्र हे वस्तुस्थिती लपवून व खोटे सुचन करुन मिळवलेले आहे असे दिसून येते. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे ;

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र.२ याच्या हक्कात दि. २५/०९/२०१४ रोजीच्या

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१०५२/२०१४ मधील आदेशानुसार दिलेले वारस प्रमाणपत्र हे भारतीय उत्ताराधिकारी कायदा, १९२५ चे कलम ३८३ नुसार रद्द करण्यात येते.

३. गैरअर्जदार क्र.२ यास दिलेले मुळ वारसप्रमाणपत्र हजर करण्यासाठी नोटीस पाठविण्यात यावी. ते गैरअर्जदार क्र.२ याच्याकडून जमा करुन घेऊन त्यावर रद्द केले अशी टिप नोंदवून दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१०५२/२०१४ मध्ये ठेवण्यात यावे.

४. मुळ संचिका दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१०५२/२०१४ ही प्रकरण निकाली काढण्यासाकरीता जिल्हा न्यायालयातील अभिलेख कक्षातुन मागविण्यात आली होती, ती तात्काळ परत करण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ASHOK RAMAKANT SHENDGE
Date: 2025.10.16 15:19:57 +0530

दिनांक – १४/१०/२०२५

(**अ. र. शेंडगे**)
१४ वे सह दिवाणी न्यायाधीश
औरंगाबाद.

टिकेआर/–